# शेतकऱ्यांच्या कर्तृत्वाला लाभली अॅग्रोवन अॅवॉर्डस्‌ची झळाळी

पुणे येथे शुक्रवारी झालेल्या दिमाखदार सोहळ्यात 'अॅग्रोवन स्मार्ट शेतकरी अॅवॉर्ड' प्रदान करून राज्यातील अकरा शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला. कष्ट, हुशारी, जिद्द यांच्या जोरावर प्रतिकूलतेवर मात करीत शेतीत गाजवलेल्या कर्तृत्वाचा पुरस्कारांच्या रूपाने सन्मान करण्यात आला. मान्यवर तज्ज्ञ तसेच राज्यभरातील शेतकऱ्यांनी या सोहळ्याला आवर्जून उपस्थिती दर्शविली.



बँक ऑफ महाराष्ट्रचे सरव्यवस्थापक रमेश क्षीरसागर व 'सकाळ'चे मुख्य संपादक श्रीराम पवार यांच्या हस्ते स्मार्ट कृषी उद्योजक अॅवॉर्ड स्वीकारताना विकास दांगट.



जैन इरिगेशन सिस्टिम कंपनीचे सहव्यवस्थापकीय संचालक अतुल जैन यांच्या हस्ते अॅग्रोवन विदर्भाचा स्मार्ट शेतकरी अॅवॉर्ड स्वीकारताना मोहन जगताप.



अतुल जैन यांच्या हस्ते अॅग्रोवन स्मार्ट सेंद्रिय शेतकरी अॅवॉर्ड स्वीकारताना प्रभाकर चौधरी.



'सकाळ'चे चीफ ऑपरेटिंग ऑफिसर महेंद्र पिसाळ व 'अॅग्रोवन'चे सरव्यवस्थापक प्रमोद राजेभोसले यांच्या हस्ते अॅग्रोवन स्मार्ट महिला शेतकरी अॅवॉर्ड स्वीकारताना विद्या रुद्राक्ष.



अॅग्रोवन अॅवॉर्ड निवड समितीचे परीक्षक अंकुश पडवळे व चौधरी यात्रा कंपनीचे संचालक ब्रिजमोहन चौधरी यांच्या हस्ते अॅग्रोवन कोकणचा स्मार्ट शेतकरी अॅवॉर्ड स्वीकारताना रामचंद्र सावे.



यूपीएल कंपनीचे तंत्रज्ञान प्रशिक्षण आणि पूरक विभागाचे प्रमुख डॉ. माधव नाटेकर यांच्या हस्ते अॅग्रोवन पश्चिम महाराष्ट्राचा स्मार्ट शेतकरी अॅवॉर्ड स्वीकारताना तानाजी हाके.



सोनाई कॅटल फीडचे संचालक किशोर माने व 'सकाळ'चे मुख्य संपादक श्रीराम पवार यांच्या हस्ते अॅग्रोवन स्मार्ट कृषिपूरक व्यवसाय अॅवॉर्ड स्वीकारताना पृथ्वीराज दिलीप चव्हाण.



ओरिएंटल इन्शुरन्सच्या क्षेत्रीय व्यवस्थापक विनिता जोशी व 'सकाळ'चे संचालक भाऊसाहेब पाटील यांच्या हस्ते अॅग्रोवन उत्तर महाराष्ट्राचा स्मार्ट शेतकरी अॅवॉर्ड स्वीकारताना नाना पाटील.



'अॅग्रोवन'चे संपादक आदिनाथ चव्हाण व अॅवॉर्ड निवड समितीचे परीक्षक डॉ. व्यंकट मायंदे यांच्या हस्ते अॅग्रोवन मराठवाड्याचा स्मार्ट शेतकरी अॅवॉर्ड स्वीकारताना रवींद्र देवरवाडे.

## अॅग्रोवनमुळे माझे प्रयोग राज्यभरात विस्तारले : माने

**पुणे (प्रतिनिधी) :** अॅग्रोवनचा मी पहिल्या दिवसापासून वाचक आहे. यातील माहिती वाचून प्रयोगशील शेतीला शास्त्रज्ञ आणि विद्यापीठांमधील तंत्राची जोड दिली. अॅग्रोवनमुळे माझे प्रयोग राज्यभरात विस्तारले आणि त्यामुळेच माझ्यासारखा सामान्य शेतकरी अमेरिकेचे त्यावेळचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांच्याशी ऊस शेतीच्या प्रयोगावर बोलू शकला, असे उद्गार ऊस उत्पादक शेतकरी संजीव माने यांनी काढले.



सकाळ माध्यम समूहाकडून दिला जाणारा मानाचा ''अॅग्रोवन महाराष्ट्राचा स्मार्ट शेतकरी पुरस्कार'' संजीव माने यांना एका दिमाखदार सोहळ्यात प्रदान करण्यात आला. राज्याच्या ऊस शेतीत शास्त्रज्ञांच्या तोडीचे क्रांतिकारक प्रयोग करणाऱ्या संजीव माने यांनी हजारो सामान्य शेतकऱ्यांपर्यंत ऊस उत्पादकता वाढीचे तंत्र पोचविले आहे. पुण्याच्या टिळक स्मारक सभागृहात त्यांना टाळ्यांच्या गजरात सहकारमंत्री सुभाष देशमुख यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला.

'उसाचे माझे पूर्वी एकरी उत्पादन २० टनांचे होते. विविध शास्त्रज्ञांच्या मदतीमुळे मी १२० टनांपर्यंत पोचलो आहे. अॅग्रोवनमधील तंत्र, शास्त्रज्ञांकडून मिळणारी माहिती यामुळे माझी प्रयोगशीलता सतत फलदायी ठरत गेली. आता आम्हाला २०० टनांचे लक्ष्य गाठायचे आहे. २०१० मध्ये मला अमेरिकेचे राष्ट्रध्यक्ष बराक ओबामा यांच्यासोबत ऊस शेतीमधील प्रयोगाबाबत सात मिनिटे बोलण्याची संधी मिळाली होती. त्यांच्याच निमंत्रणावरून मी अमेरिकेचा दौरा केला. तेथील परिषदेत मी १७ मिनिटांचे सादरीकरणदेखील केले. हे सर्व केवळ प्रयोगशील शेतीमुळे घडले. त्यामुळे अॅग्रोवन आमचे बळ असून मला मिळालेला हा घरचा पुरस्कार आहे, असेही श्री. माने म्हणाले.

## शेतकरी स्वतःच्या हिमतीवर उभा राहावा : प्रतापराव पवार

**टीम अॅग्रोवन**

पुणे : शेतकरी स्वतःच्या हिमतीवर उभा राहावा. शेतकऱ्याने प्रयोग करावेत, शेतीपुढील प्रश्न कसे सोडवावेत याचा विचार करावा, त्याला सरकारसह कुणाच्याही मदतीची गरज भासू नये, असे प्रयत्न करावेत, असे प्रतिपादन 'सकाळ माध्यम समुहा'चे अध्यक्ष प्रतापराव पवार यांनी शुक्रवारी येथे केले.

सकाळ-अॅग्रोवनच्या स्मार्ट शेतकरी पुरस्कार वितरण सोहळ्याप्रसंगी श्री. पवार बोलत होते. ते म्हणाले, की लोकांच्या साहाय्याने लोकांना सोबत घेऊन लोकांसाठी काम करायचे ही दैनिक 'सकाळ'ची परंपरा आहे. व्यवस्थेत शेतकरी हा मोठा वर्ग आहे. हे जाणून 'सकाळ'चे व्यवस्थापकीय संचालक अभिजित पवार यांनी जेव्हा अॅग्रोवनची संकल्पना मांडली तेव्हा सुरवातीला काहींनी हा वेडेपणा ठरवला. शेतकरी वाचत नाही, तेव्हा कुठे हे वृत्तपत्र चालणार, अशी चर्चा झाली. मात्र, शेतकऱ्यांनी स्वतःच हा गैरसमज खोटा ठरवला आहे.

'सकाळ'ने राज्यातील दुष्काळी भागात पाण्याबाबत सामाजिक बांधिलकीच्या जाणीवेतून सुमारे ५०० गावे टंचाईमुक्त करण्यात यश आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. हजारो शेतकऱ्यांना याचा लाभ झाला. कोट्यवधींची उलाढाल शक्य झाली. ते पुढे म्हणाले, महिलांची मोठी शक्ती नजरेसमोर ठेवून महिलांसाठी तनिष्का हे व्यासपीठ उपलब्ध केले आहे. नापिकी, कर्जबाजारीपणा आणि इतर नैसर्गिक संकटांमुळे शेतकरी आत्महत्या करतात, याची खंत व्यक्त करताना त्यांनी महिला मात्र जिद्दीने उभी राहते, ती कधीही आत्महत्या करीत नाही, ती संकटाचा धाडसाने मुकाबला करते, असे सांगत महिलांमध्ये असे अलौकिक सामर्थ्य असते, याचा उल्लेख केला.




'सकाळ माध्यम समुहा'चे अध्यक्ष प्रतापराव पवार यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

हे सांगत असताना त्यांनी अॅग्रोवन प्रेरणा पुरस्कार मिळालेल्या ज्योतीताई देशमुख यांचा आवर्जून उल्लेख केला. त्यामुळे शेतकऱ्यांना प्रेरणा मिळावी, त्यांच्यात काम करायची इच्छा निर्माण व्हावी त्यासाठी हा पुरस्कार दिला जात असल्याचे सांगून चांगलं घडतंय, घडू शकतंय हे सांगायचा उद्देश त्यामागे असल्याचे श्री. पवार यांनी स्पष्ट केले. शेतकरी स्वतःच्या हिमतीवर उभा राहावा. शेतकऱ्याने प्रयोग करावेत, नाशिकच्या सह्याद्री अॅग्रो फूड्ससारख्या संस्था उभाराव्यात, शेतीपुढील प्रश्न कसे सोडवावेत याचा विचार व्हावा, त्याला सरकारसह कुणाच्याही मदतीची गरज भासू असे प्रयत्न करावेत, असा सल्लाही त्यांनी यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना दिला. आगामी काळातही शेतकऱ्याला आणखी काही नवीन देता येईल याचा प्रयत्न सुरू आहे. शेतकऱ्यांना उत्कृष्ट बियाणे मिळावं यासाठीसुद्धा सकाळ प्रयत्नशील असल्याचे सांगताना पुढील वर्षी याबाबत विस्ताराने बोलेन, असेही श्री. पवार म्हणाले.



श्रीमती ज्योती देशमुख यांना स्मार्टकेम टेक्नॉलॉजी कंपनीचे उपाध्यक्ष (मार्केटिंग व स्ट्रॅटेजीज) नरेश देशमुख यांच्या हस्ते प्रेरणा पुरस्काराने गौरविण्यात आले. शेजारी 'स्मार्टकेम'चे सहयोगी उपाध्यक्ष विजयराव पाटील, भाऊसाहेब पाटील, आदिनाथ चव्हाण, प्रमोद राजेभोसले.

## 'तिच्या' कर्तृत्वापुढं शब्दही झाले मुके!

### अॅग्रोवन स्मार्ट शेतकरी अॅवॉर्ड – प्रेरणा पुरस्कार

**टीम अॅग्रोवन**

पुणे : कुटुंबातल्या तीन कर्त्या पुरुषांना हिरावून घेणाऱ्या नियतीला तिने आज हरवलं होतं... तिच्या कर्तृत्वापुढं नियतीही ठेंगणी झाली... जस जसा तिच्या धैर्याचा, जिद्दीचा पट उलगडला गेला, तसतसा तिच्या संघर्षाच्या कहाणीनं उपस्थितांचं मन हेलावलं अन् शब्दही काहीसे मुके झाले. अॅग्रोवन प्रेरणा पुरस्काराने सन्मानित झालेल्या अकोला जिल्ह्यातील कट्यार येथील श्रीमती ज्योती देशमुख यांच्या या कर्तृत्वाला उपस्थितांनी मग थेट उभं राहूनच सलाम केला.

अॅग्रोवन स्मार्ट अॅवॉर्डच्या दिमाखदार सोहळ्यात ज्योती यांना मिळालेल्या प्रेरणा पुरस्काराने सगळ्यांचेच लक्ष वेधून घेतले. स्मार्टकेम टेक्नॉलॉजीचे उपाध्यक्ष नरेंद्र देशमुख आणि सहयोगी उपाध्यक्ष विजयराव पाटील यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण झाले. नापिकी, शेतमालाचे कोसळलेले दर आणि भरून न निघणारा शेतीतला तोटा, या परिस्थितीसमोर हात टेकलेल्या कुटुंबातल्या तीन कर्त्या पुरुषांनी एकापाठोपाठ एक करत जीवनयात्रा संपवली असताना ती डगमगली नाही, उमेद हरली नाही, मोठ्या जिद्दीनं, हिमतीनं उभी राहिली, जगण्याचा संघर्ष केला. जवळपास २९ एकर शेतीचा पसारा स्वतः हातात घेतला. यापूर्वी कधीही शेतीत न गेलेल्या ज्योती यांनी मोठ्या धाडसाने शेती कसण्यास सुरवात केली. लोकांनी नावं ठेवली; पण त्याकडं दुर्लक्ष करत सोयाबीन, कापूस, हरभरा या पिकांच्या उत्पादनवाढीत आघाडी घेतली. त्यातून सावरत त्यांनी कुटुंबाला स्थिरस्थावर केलं. ज्योती यांच्या या कर्तृत्वाची माहिती एका चित्रफितीतून सांगितली जात होती, तेव्हाच त्यांच्याकडं पाहून खऱ्या अर्थानं प्रेरणादायी अशा त्यांच्या कामगिरीचं सगळ्यांनाच अप्रूप वाटलं.

पुरस्कार स्वीकारण्यासाठी त्या जेव्हा मंचावर आल्या, तेव्हा दोन शब्द बोलण्यासाठी आग्रह झाला. त्या म्हणाल्या, ''लोकांनी नावं ठेवली, बाईनं कधी शेती केली का? लोकांच्या बोलण्याकडं दुर्लक्ष केलं. घर चालवायचं, मुलाचं शिक्षण करायचं, थांबून चालणार नव्हतं. निर्णय घेतला, रात्री अपरात्री शेतात जावं लागे, पिकाची राखण करणं, पाणी देणं, अशी सगळी कामं केली, स्वतःच्या शेतात काम करायला लाज आणि भीती कसली, अन माझ्यासमोर दुसरा पर्यायही नव्हता. त्या सांगत होत्या, तेव्हा क्षणभर त्यांचे डोळे भरले, शब्दही मुके झाले. त्यांच्या करुण कहाणीनं उपस्थितांचं मन हेलावलं अन् भावविवश झालेल्या सभागृहानं उभा राहून त्यांच्या कर्तृत्वाला सलाम केला. अॅग्रोवन स्मार्ट अॅवॉर्ड पुरस्कारातील हे एक वेगळं नाव, वेगळं कर्तृत्व, ज्यानं सगळं संपलं म्हणता म्हणता... जगायला, लढायला पुन्हा उभं राहायला प्रेरणा दिली.

### स्मार्टकेमकडून २१ हजारांचे साह्य

**'स्मार्टकेम'चे उपाध्यक्ष नरेंद्र देशमुख यांनी त्यांना पुरस्कार प्रदान केला, तेव्हा त्यांनीही ज्योती यांच्या धैर्याला, जिद्दीला दाद देत त्यांच्या कामगिरीचं कौतुक केलं आणि कंपनीकडून खतांच्या रूपात २१ हजार रुपयांचे साह्य देत असल्याचे जाहीर केले.**



श्रीमती ज्योती देशमुख यांना प्रेरणा पुरस्कार प्रदान करतेवेळी उपस्थितांनी उभे राहून त्यांच्या असीम धैर्याला आणि कर्तृत्वाला मानवंदना दिली.